यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade

अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

प्रेषक: नागार्जुन वाडेकर
प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन

विषय: महात्मा फुले जयंतीनिमित्त व्याख्यानाचे परिपत्रक काढण्याबाबत...

जावक क्र.: यचममुवि/मानव्य/बाआअध्यासन/२०२४/१६८

प्रति: मा. कुलसचिव

दिनांक: ०८.०४.२०२४

मा. कुलगुरू यांच्या मान्यतेने आपल्या विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीने महात्मा फुले जयंतीनिमित्त (११ एप्रिल) विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीमधील सभागृहात बुधवार दि. १० एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रेरणादायी युवा वक्ते म्हणून लोकप्रिय असलेले मा. डॉ. सतीश आहेर यांच्या "महात्मा फुले यांचे भारतीय समाजक्रांतीतील योगदान" या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. कुलगुरू भूषवतील.

तरी, विद्यापीठातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी, शैक्षणिक सल्लागार, शैक्षणिक संयोजक, कंत्राटी कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी सदर व्याख्यानाला उपस्थित राहण्याबाबत परिपत्रक काढावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

Wadekar
०८/०४/२०२४

(नागार्जुन वाडेकर)
प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन

**सोबत:** परिपत्रकाचा मसुदा

**DFA**

**परिपत्रक**

आपल्या विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीने **महात्मा फुले जयंतीनिमित्त** प्रेरणादायी युवा वक्ते म्हणून लोकप्रिय असलेले मा. डॉ. सतीश आहेर यांच्या “महात्मा फुले यांचे भारतीय समाजक्रांतीतील योगदान” या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

मा. कुलगुरू कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील.

**विषय:** **महात्मा फुले यांचे भारतीय समाजक्रांतीतील योगदान**
**व्याख्याते : मा. डॉ. सतीश आहेर**
**दिनांक:** **बुधवार, १० एप्रिल २०२४ वेळ: सकाळी ११.३० वाजता**
**स्थळ:** **शैक्षणिक इमारत सभागृह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२**

तरी, विद्यापीठातील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी, शैक्षणिक संयोजक, शैक्षणिक सल्लागार, कंत्राटी कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी सदर व्याखायानाला उपस्थित राहण्याबाबत परिपत्रक काढावे, ही विनंती.

(दिलीप भरड)
कुलसचिव

**प्रत : माहितीस्तव**

- मा. कुलगुरू कार्यालय
- मा. प्र- कुलगुरू कार्यालय

प्रत : सर्व विद्याशाखा/ विभाग संचालक, विभाग, केंद्र, कक्ष प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व सहकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

डॉ. बाबासाहेब
आंबेडकर अध्यासन
12.04.2

पुण्य नगरी | शुक्रवार, १२ एप्रिल २०२४

# महात्मा फुलेंनी समाजक्रांतीचा दीपस्तंभ उभारला : आहेर



नाशिक : महात्मा जोतिबा फुले यांनी गोरगरीब, वंचितांना सामाजिक गुलामगिरीतून बाहेर काढले. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही आधुनिक बीजे महात्मा फुलेंनी प्रथम रोवली. समाजक्रांतीचा दीपस्तंभच महात्मा फुलेंनी उभा केला. त्यामुळेच समतेचे वारे घराघरात वाहू लागले, असे प्रतिपादन युवा वक्ते सतीश आहेर यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीने महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त मुक्त विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीमधील सभागृहात सतीश आहेर यांनी 'महात्मा फुले यांचे भारतीय समाजक्रांतीतील योगदान' या विषयावर विचार मांडले. मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी मंचावर व्यवस्थापन मंडळाचे सदस्य तथा संचालक डॉ. जयदीप निकम, कुलसचिव दिलीप भरड उपस्थित होते. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी, महात्मा फुलेंचे मानवतेचे विचार अंगीकारण्याचे आवाहन केले. महात्मा फुले स्वतः शेतकरी होते. शेतीतून येणाऱ्या अनुभवातून त्यांनी शेतकऱ्यांचा आसूड हे पुस्तक लिहिले, असे सोनवणे म्हणले. दत्ता पाटील यांनी सूत्रसंचालन केले; तर सचिन शिदे यांनी आभार मानले.

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
आवक क्र.: 220
दिनांक : 12/04/2024

सकाळ
नाशिक, गुरुवार, ११ एप्रिल २०२४



**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनातर्फे महात्मा फुले जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानाप्रसंगी सतीश आहेर. शेजारी कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, डॉ. जयदीप निकम, दिलीप भरड.

# महात्मा फुलेंमुळे समतेचे वारे घराघरांत

## सतीश आहेर : मुक्त विद्यापीठात व्याख्यान


■ **सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १० : हजारो वर्षे तळागाळात राहिलेला समाज अंधश्रद्धांमध्ये जखडला होता. त्यांना सामाजिक गुलामगिरीतून महात्मा फुले यांनी बाहेर काढले. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही आधुनिक बीजे त्यांनी रोवली. महात्मा फुले यांनी समाजक्रांतीचा दीपस्तंभ उभा केला. त्यामुळेच समतेचे वारे घराघरांत वाहू लागले, असे प्रतिपादन प्रेरणादायी वक्ते सतीश आहेर यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनातर्फे महात्मा फुले जयंतीनिमित्त विद्यापीठ शैक्षणिक इमारतीतील सभागृहात आयोजित व्याख्यानाप्रसंगी ते बोलत होते. 'महात्मा फुले यांचे भारतीय समाजक्रांतीतील योगदान' असा व्याख्यानाचा विषय होता. याप्रसंगी महात्मा फुलेंच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते. याप्रसंगी व्यवस्थापन मंडळाचे सदस्य तथा संचालक डॉ. जयदीप निकम, कुलसचिव दिलीप भरड उपस्थित होते. श्री. आहेर म्हणाले, की सहकार चळवळदेखील महात्मा फुलेंची देणं आहे. शेतकऱ्यांवर त्यांचे प्रचंड प्रेम होते, पुढे शेतकऱ्यांसाठी आंदोलने केली. शेतीमालाला चांगला भाव मिळावा, दलालांपासून शेतकऱ्यांची सुटका व्हावी, या उद्देशाने आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी कंपनी स्थापन केली. शेतकऱ्यांचा माल शहरात पाठवून त्याला चांगला भाव मिळावा, असा उदात्त विचार फुलेंनी त्यावेळी मांडला. महात्मा फुलेंनी व्यसनमुक्तीसाठीदेखील लढा दिला. तरुणांना त्यांनी अंमलीपदार्थापासून दूर राहण्याचा संदेश दिला. स्त्री-पुरुष समानतेचा विचार महात्मा फुलेंनी आचरणात आणला. त्याचबरोबर आधुनिक प्रगत विचारांची बीजे त्यांच्या लिखाणात तसेच विचारात दिसून येतात. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. सोनवणे म्हणाले, की महात्मा फुलेंचे मानवतेचे विचार अंगीकारले पाहिजे. महात्मा फुले स्वतः शेतकरी होते, शेतीतून येणाऱ्या अनुभवातून त्यांनी शेतकऱ्यांचा आसूड हे पुस्तक लिहिले. याप्रसंगी त्यांनी महात्मा फुलेंचे सामाजिक कार्य उपस्थितांसमोर मांडले. दत्ता पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सचिन शिंदे यांनी आभार मानले.

**DESHDOOT** *Times* 4
NASHIK, FRIDAY, APRIL 12, 2024

# Phule was pioneer of social revolution: Aher



**NASHIK:** Nashik bore witness to a stirring tribute to Mahatma Jyotirao Phule, as Satish Aher, an inspiring youth, emphasized Phule's profound impact on Indian society. Aher passionately articulated how Mahatma Phule liberated the marginalized communities from the shackles of superstition, igniting the flames of social emancipation.

Speaking at the lecture organized by the Babasaheb Ambedkar Dais of Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Aher delved into Phule's invaluable contributions to the Indian social fabric. He underscored Phule's role as a harbinger of freedom, equality, and fraternity, heralding a profound social revolution that reverberated across every stratum of society.


Vice-Chancellor Prof. Sanjeev Sonawane presided over the event, while members of the university's management Dr. Jaydeep Nikam and registrar Dilip Bharad were present on the dais.

Aher illuminated Phule's advocacy for the co-operative movement and his unwavering support for farmers' rights, which culminated in groundbreaking initiatives to secure fair prices for agricultural produce and liberate farmers from exploitative practices.

Prof. Sonawane emphasized the enduring relevance of Mahatma Phule's humanitarian ideals, drawing inspiration from Phule's own experiences as a farmer, encapsulated in his seminal work, 'Shetkarancha Asud'. The audience was captivated as Prof. Sonawane elaborated on Phule's extensive social endeavours, highlighting his tireless efforts to uplift the downtrodden.

Datta Patil compered the programme, while Sachin Shinde proposed a vote of thanks. The event garnered participation from directors and professors representing various disciplines, underscoring the enduring legacy of Mahatma Phule's transformative vision.

लोकमत
epaper.lokmat.com
नाशिक, शुक्रवार, दि. १२ एप्रिल २०२४
3



नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात महात्मा जोतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे आणि कुलसचिव दिलीप भरड यांनी महात्मा जोतिराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी महेंद्र बनसोडे यांनी केले. कार्यक्रमास विद्यापीठाचे विशेष कार्य अधिकारी प्रमोद भडकवाडे, ग्रंथालय प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे, सुनील निकम, तुकाराम पाटील, बाळू साबळे आदी उपस्थित होते.

LOKMAT TIMES Monday, 15.04.2024

LOKMAT TIMES • Anchor

# 'We will always be grateful to Mahatma Jyotiba Phule'

Said motivational speaker Dr Satish Aher during his lecture in YCMOU

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, APR 14

Yashwantrao Chavan Maharashtra Open University (YCMOU) had organised a lecture on the topic 'Mahatma Jyotiba Phule's Contribution to India's Social Revolution' by the motivational speaker Dr Satish Aher, on Wednesday, April 10 in the auditorium of YCMOU, on the occasion of the birth anniversary of Mahatma Jyotiba Phule. This lecture was organised by the Dr Babasaheb Ambedkar Chair of YCMOU.

The dignitaries paid floral tributes at the image of Mahatma Jyotiba Phule at the beginning of the programme, which was presided over by Vice-Chancellor of YCMOU, Prof Sanjeev Sonawane. Member of the Board of Management and Director Dr Jaydeep Nikam and Registrar Dilip Bharad were also present on the occasion.

Dr Satish Aher said, "We will always be grateful to Mahatma Jyotiba Phule. The society was in the darkness of blind faith for thousands of years, and Mahatma Phule brought the society out of that social slavery. The ideal of freedom, equality, and fraternity was firstly raised by him. Mahatma Phule erected the beacon of the social revolution, and because of him the undercurrents of equality started flowing in the society."



Elaborating further, he said, "Mahatma Phule had immense love for farmers and initiated movements for their welfare. He established a company with the help of his supporters, to ensure fair prices for farmers and to eliminate middlemen. During that period, Mahatma Phule put forth a noble idea that the products of farmers should be sent to the city to fetch a fair price. Along with this, Mahatma Phule also fought for an addiction-free society and advised youth to stay away from addictive substances. He promoted the idea of gender equality, and modern progressive thoughts are reflected in his writings."

Prof Sanjeev Sonawane spoke about the social work of Mahatma Phule and said, "We should adopt Mahatma Phule's ideas of humanity. Mahatma Phule himself was a farmer, and he wrote the book 'Shetkaryacha Asud'.

The programme was anchored by Datta Patil, while a vote of thanks was proposed by Sachin Shinde. Directors, professors, teachers, officers, employees, academic coordinators of various faculties of the university were present on the occasion.